# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०८/२०२५ (शुक्रवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ३५ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त, २ आरोपी अटक रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक ०७/०८/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा तुमसर रामटेक रोडवर नवरगाव शिवारात टिप्पर क्रमांक एम.एच. ४० सी. टी १८१९ मध्ये क्षमतेपेक्षा अधिक विना परवाना चेरटी रेतीची वाहतुक करीत आहे. अश्या माहीती वरून सदर टिप्पर थांबवून चालक नामे सतीश चिंधुजी बावणे वय ३८ वर्ष रा. खापा ता. तुमसर जिल्हा भंडारा हयाला रेती वाहतुकीच्या परवाना विचारला असता त्यांनी परवाना नसल्याचे सांगितले. सदर टिप्परची पंचासमक्ष पाहणी केली असता अंदाजे १० ब्रास रेती मिळून आली. वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक रूपेश वसंतराव देशमुख रा. खापा तालुका तुमसर जिल्हा भंडारा असून, पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम.एच. ४० सी.टी. १८१९ किमती ३५,००,००० /— रूपये व २) १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये आणि असा एकुण ३५,६०,०००/— रूपयेचा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद वाहन चालक आरोपी नामे सतीश चिंधुजी बावणे वय ३८ वर्ष रा. खापा ता. तुमसर जिल्हा भंडारा व मालक रूपेश वसंतराव देशमुख रा. खापा तालुका तुमसर जिल्हा भंडारा यांचे विरूध्द पोस्टे रामटेक येथे अप क्र. ५८४/२५ कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खान आणि खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान

प्रतिबंधक अधि. १९८४, सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री/ वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १६ गुन्हे नोंद एकुण १,४०,०७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०७/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री आणि वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू आणि वाहतुकीसाठी वापरलेले वाहन असा एकुण १,४०,०७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी क्रं** ०१) दिनेश दिलीप राजपुत, वय २९ वर्ष, रा. प्रभाग क्र. २ तिडंगी पोस्ट नांदागोमुख ता. कळमेश्वर जि. नागपूर यांचेवर **देशी दारू वाहतुक प्रकरणी गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी क्रं** ०१) अजय रविंन्द्र सलाम, वय २७ वर्ष, ०२) रविंन्द्र देवराव सलाम, वय ६० वर्ष, ०३) सौ. ललिता रविंन्द्र सलाम, तिन्ही रा. वार्ड क्र. ०४ ता. जि. नागपूर यांचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपी क्र.** १) मनंचला रत्नसिंग राजपुत,वय ४१ वर्ष रा वार्ड क्र. १ चिचभवन निमजी ता कळमेश्वर २. मारोती मल्हारी बुरलेवार वय ७४ वर्ष रा. वार्ड क्र. ०५ केळवद ३. अनिल शंकर बुरलेवार वय ३४ वर्ष रा. वार्ड क्र ०५ केळवद याचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी क्र. १ किशोर रमेश सुरजुसे, वय ४० वर्ष, रा. अन्नपुर्णा नगर काटोल, २. दिलीप संतोष बहेकर वय ६० वर्ष रा. सरस्वती मंदीर जवळ काटोल ४. दिलीप गंगाधरराव सातफळे वय ६४ वर्ष ५. मनोज प्रकाशराव सातफळे वय ४२ वर्ष दोन्ही रा. पंचावटी काटोल याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**,** आरोपी क्रं १. विजय अनिल धुर्वे वश २२ वर्ष २. प्रविण अजाबराव सरोडीया दोन्ही रा. पानवडी ता. काटोल ३. बाळकृष्ण संतोषराव वहीकर वय ५५ वर्ष रा. सरस्वती नगर काटोल **यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**. आरोपी नामे १. विनोद दत्तुजी पवार वय ३८ वर्ष रा. लाडगाव २. अक्षय फत्तुसिंग मारवाडी वय ३१ वर्ष रा मेंढपठार ता. काटोल १. सुनील अनिल चनकापुरे, वय ३६ वर्ष, रा. चिखली ता. काटोल, यांचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १. आशिष चिंधबाजी बन्सोड, वय ४३

वर्ष, रा. खरसोली ता. नरखेड २. राहुल हेमराज धोतरे वय २० वर्ष रा. वार्ड क्र. १५ नरखेड ३. नरेन्द्र शेषरावजी बनसिंगे वय ४२ वर्ष रा. आंबाडा देशमुख ता. नरखेड राजेंद्र दौलतराव मोहोड वय ५८ वर्ष रा. आंबाडा देशमुख ता. नरखेड ३. निलकंठ जन्नु युवनाते वय ४१ वर्ष रा. मोवाड ता. नरखेड **याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे.**

अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १६ गुन्हे दाखल केले आहे.**



# नागपुर ग्रामीण पोलीसांची सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई करून किमंत ४,६१,१४० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दिनांक ०८/०८/२०२५ रोजी पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ पोस्टे अवैध धंदयावर कारवाई कामी हद्दीत पेट्रोलींग करीत असता त्यांना अवैध जुगाराबाबत गोपनीय माहिती मिळाली . मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून गुन्हे नोंद केले.

१. कोंढाळी टाउन ०.५ पुर्व येथे आरोपी नामे १) गणेश नारायणराव धुर्वे वय ३० वर्ष रा. राजुवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती, ह.मु.दुधाळा २) राजा बबनसिंग राठोड वय २५ वर्ष रा. विकासनगर, कोंढाळी, ता.काटोल, जि.नागपूर ३) बाळु दिलीप ठाकरे वय ३२ वर्ष रा. कुंभारपुरा कोंढाळी, ता काटोल, जि.नागपूर ४) मोरेश्वर नामदेव ठाकरे वय २६ वर्ष रा.भोईपुरा कोंढाळी, ता. काटोल, जि.नागपूर, ५) साहील शेख शकील शेख वय २६ वर्ष रा.कुंभारपुरा कोंढाळी, ता. काटोल, जि.नागपूर, ६) रवींन्द्र पंजाबराव कळंबे वय ४५ वर्ष रा.सायखोड कोंढाळी, ता.काटोल, जि.नागपूर, ७) योगेश ज्ञानेश्वरराव डोके वय २९ वर्ष रा.परसोडी, ता.कळमणा, जि.यवतमाळ, ह.मु.ईकॉनॉमिक्स कंपनी कॉटर, सावंगा, ता.जि.नागपूर, ८) इमरान खॉ शमशेर खॉ पठाण वय ४४ वर्ष रा.कोंढाळी, ता.काटोल, जि.नागपूर हे कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन वरील आरोपी यांची झडती घेतली त्याच्या ताब्यातुन एक सट्टापट्टीचे आकडे लिहीलेला एक नोटबुक ,पेन , कॅलकुलेटर, ५२ तास पत्ते व नगदी ३,३१०/— रुपये असा एकुण ३,३१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अमहाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२. पारशिवनी मौजा हेटीटोला ता रामटेक पुर्व २१ किमी येथे आरोपी नामे १)विश्वनाथ शंकर भोंडे रा हेटीटोला २) रोशन ताराचंद मडावी रा हेटीटोला ०३) विलास टिल्लुजी सराटे रा हेटीटोला ४) सिताराम श्रीराम नेवारे रा हेटीटोला ता रामटेक कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन चारही आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष त्यांचा ताब्यातुन ५२ तासपत्ते किमत ५० रू व नकदी १६२०/रु व आयटेल कंपनीचा मोबाईल कि ८००/रु व निळा रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल कि १०,०००/रु असा एकुण १२४७० रू चा माल मिळुन आला.

3. कळमेश्वर मौजा पिल्कापार येथे आरोपी नामे १) बबलु उर्फे गौरव तुकाराम कांबळे वय ३५ वर्ष रा. पारशिवनी २) रशिकांत रमेश बागडे वय ३६ वर्श रा. पारषिवनी ३) संजय षंकर कुझलवार वय ४७ वर्ष रा. पारशिवनी ४) रूपेश कामडे वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र ०३ पारशिवनी ५) लक्ष्मण चिंदभाजी वंजारी वय ५४ वर्श रा. वार्ड क्र १० पारशिवनी ६) संजय देवाजी मेश्राम वय ५४ वर्श राच वार्ड क्र ०२ माळेगाव ७) गजानन सुरेश बोबडे वय ३२ वर्ष रा. मोहपा ८) फरार आरोपी नंदु केवटे रा. मोहपा ९) शैलेश तुरारे रा. मोहपा. कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन सर्व आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष त्यांचा ताब्यातून १) वन प्लस मोबाईल किंमत ५००० २) १ नथींग कंपनीचा २ ए मोबाईल किं १०,०००, ३) ओप्पो कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल किं ७००० ४) सॅमसंग कंपनीचा मोबाईल ६०००५) नोकीया कंपनीचा मोबाईल ५०० ६) ओप्पो कंपनीचा मोबाईल किं ७०००, ७) रेड मी कंपनीचा मोबाईल किं ७०००, ८) सिल्वर रंगाची मारूती सुझुकी कंपनीची इर्टिका कार जिचा नं एचएच ०५ सीव्ही ४२४१ कि. ४,००,०००, ९) पेसे २८६०, १०) ५२ पास पत्ते कि. ००, असा एकुण ४,४५,३६० रू चा माल मिळून आला.

असा एकूण **किमंत ४,६१,१४० रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ३ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** :— काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे १. सुरेश भिमराव मोहाड वय ५१ वर्षे, रा. अजंनगाव ता. काटोल, जि. नागपुर,हा मौजा मेटपांजरा १२ किमी पुर्व येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** जलालखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना बस स्टॉप च्या मागे जलालखेडा ता. नरखेड येथे आरोपी नामे अनंता किशोर वानखेडे वय ३८ वर्ष, रा. खामगाव ता. काटोल जि. नागपुर हा अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे सुनील लालबाहादुर यादव वय ४२ वर्ष रा खदान नं ०३ मउीबाबा कन्हान ०७ किमी पश्चिम हा खदान नं ०३ कन्हान ०७ किमी पश्चिम येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण ३ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०७/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०८/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री. सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सावनेर टाउन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री. सागर खर्डे, यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. गांधी चौक व गडकरी चौक येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये सावनेर पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने